# महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)

**(विद्यापीठ अनुदान आयोग मान्यताप्राप्त व महाराष्ट्र व गोवा शासन प्राधीकृत)**

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ


सेट भवन, गणेशखिंड पुणे,-४११००७.

| | | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्र.: ०२० – २५६२२४४६<br>संकेतस्थळ : https://setexam.unipune.ac.in | | फॅक्स क्र. : ०२० – २५६९९२५०<br>ई–मेल : set_coordinator@unipune.ac.in |


सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा

OW/2026/G/96 दि. ०९/०७/२०२६

### जाहीर प्रकटन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सेट परीक्षा विभाग हा महाराष्ट्र शासनाची नोडल एजन्सी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाराष्ट्र व गोवा राज्यातील विद्यापीठ आणि वरिष्ठ महाविद्यालयात सहायक प्राध्यापक पदाची पात्रता परीक्षा घेण्याकरिता प्राधिकृत विभाग आहे.

४१ व्या सेट परीक्षेंचे आयोजन सेट विभागामार्फत करण्यात आले आहे. विलंब शुल्कासहित परीक्षा अर्ज भरण्याची मुदत दि. ७ जुलै, २०२६ रोजी संपुष्टात आली. परंतु सदर काळात महाराष्ट्रात अतिवृष्टी झाल्यामुळे काही भागात इंटरनेट सेवा विस्कळीत झाली असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरता आले नाहीत असे मेल सेट विभागास प्राप्त झाले आहेत.

त्यामुळे विद्यार्थी परीक्षा अर्ज भरण्यापासून वंचित राहू नये यासाठी विलंब शुल्कासहीत सेट परीक्षा अर्ज भरण्याची मुदत दि. १३ जुलै, २०२६ ते दि. २३ जुलै, २०२६ अशी वाढविण्यात येत असून अर्ज भरताना त्यात काही चूक झाली असेल तर ती दुरूस्त करण्यासाठीची मुदत दि. २४ जुलै, २०२६ ते २६ जुलै, २०२६ अशी देण्यात येत आहे, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**समन्वयक, सेट परीक्षा**